## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

## अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 05]

दिनांक : 08/02/2022 वेळ : सकाळी 11.30 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी 2022 ची मासिक सभा मंगळवार दिनांक 08/02/2022 रोजी सकाळी 11.30 वा. अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

1. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे — सभापती
2. मा. अनुराधा गणपत गोरखे — सदस्या
3. मा.तुषार रघुनाथ हिंगे — सदस्य
4. मा.शैलजा अविनाश मोरे — सदस्या
5. मा.शर्मिला राजू बाबर — सदस्या
6. मा.अमित राजेंद्र गावडे — सदस्य
7. मा. कदम सुनिल मानसिंग — स्वीकृत सदस्य

याशिवाय मा.श्रीमती शितल वाकडे-प्र.क्षेत्रिय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार-कार्यकारी अभियंता(स्थापत्य), मा.श्री शिवाजी लोखंडे-लेखाधिकारी, मा.संजय खरात-उपअभियंता(स्थापत्य)मा.चौरे एस.आर-उपअभियंता(स्थापत्य),मा.बी.एम.शेटे-उपअभियंता (स्थापत्य), मा.लांडे बी.पी.-उपअभियंता(विद्यतु), मा.श्रीमती मोमीन झेड.आय.-उपअभियंता (झोनिपु स्थापत्य), मा.श्रीमती माने के.व्ही.-उपअभियंता(पाणी पुरवठा);श्री देसले चेतन जगन्नाथ-कनिष्ठ अभियंता, श्री अभिमान भोसले.-कनिष्ठ अभियंता(पा.पु.), श्रीमती सोनवणे पी.के. श्री अंकुश झिटे-मुख्य् आरोग्य् निरिक्षक,दिपक कोटियाना-आरोग्य् निरिक्षक, श्री मनोज शिंदे-मुख्य् लिपिक, श्री जयंत मरळीकर-अतिक्रमण पथक प्रमुख श्री रंगराव कारंडे-क्रिडा पर्यवेक्षक श्री सुनिल दत्तू नाळे-उद्यान अधिकारी, श्रीमती धनश्री भांबुरे-सहा.उद्यान अधिकारी, श्री.सुहास सामसे-उद्यान सहाय्यक श्री कदम अरविंद-उद्यान सहाय्यक, श्री पगार एस.जी.-जनरेटर ऑपरेटर इ. अधिकारी/ कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सर्व उपस्थित सन्मा. पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

सभेचे सुरुवातीस माजी खासदार कै.गजानन बाबर, सिने अभिनेता कै.रमेश देव, गानसम्राज्ञी भारतरत्न कै.लता मंगेशकर, पिं.चिं.मनपाचे माजी नगरसेवक कै.गजानन चिंचवडे यांचे नुकतेच निधन झाल्याने २ मिनिटे शांतता पाळून श्रध्दांजली अर्पण करणेत आली.

कार्यपत्रिका क्रमांक ४ दिनांक ११/०१/२०२२ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.
त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक ४**:- सन्मा.सदस्य तुषार रघुनाथ हिंगे यांचा दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड एम्पायर स्क्वेअर येथील पुलाखालील जागा पार्किंगकरिता भाडे कराराने श्री रिजवान मुजावर,रा.आण्णासाहेब मगर,टिपू सुलतान रोड,चिंचवड,पुणे ४११०१९ यांना देणेबाबतचे
प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक ५**:- सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक ०८/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

१)चिंचवड स्टेशन येथील ग्रेड सेपरेटरला "आद्यगुरु क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे" असे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी समतल वितलग या प्रमाणे देणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

२)तसेच दिनांक १७ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी आहे त्या अगोदर पुतळा सुशोभिकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

३) मोरवाडी स्मशानभूमि जवळील चौकास "प्रदिप रामचंद्र गायकवाड" यांचे नाव देणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

४) प्र.क्र.१० मध्ये रामनगर येथील राम मंदिरासमोरील दत्तनगर या ठिकाणी किन्नरांसाठी स्वच्छतागृह बांधणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक ६**:- सन्मा.सदस्य अमित राजेंद्र गावडे यांचा दिनांक ०८/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र. १५ आकुर्डी गंगानगर येथे महापालिकेची व्यापारी संकुल इमारत आहे. सदर इमारतीस सामाजिक कार्यकर्ते "कै.कैलास शंकरराव पांढारकर व्यपारी संकुल" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक ७**:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दिनांक ०८/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१५ येथे काळभोर सभागृहातील मनपा व्यायामशाळेत शौचालय नसल्याने तेथील नागरिकांची गैरसोय होत असल्याने तेथे त्वरीत शौचालय व वॉटर प्रुफिंग करुन देणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक ८**:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दिनांक ०८/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी उड्डाण पुलाखाली देणेत आलेल्या गाळेधारकांपैकी इम्रार विजापुरे व जाफर मुल्ला या फक्त् २ गाळेधारकांना तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध् करुन देणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.**

ठराव क्रमांक 19 विषय क्रमांक 1

दिनांक 08/02/2022 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: शैलजा अविनाश मोरे अनुमोदक : अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक 02/02/2022 रोजीचा प्रस्ताव.

कै.सिताराम बाबुराव काळभोर निगडी परिसरातील भूमिहिन शेतकरी आहेत. त्यांचे कुटुंबाची इ.स.१९७२ साली पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने १० एकर जामिन संपादित केली तसेच सिध्दीविनायक नगरी परिसरातील नागरिकांना जाणे-येण्यासाठी ३५ गुंठे जागा त्यांचे परिवाराने सिध्दीविनायक डेव्हलपर्स यांना दिल्यानंतर या परिसरातील नागरिकांसाठी जाणे-येण्यासाठी रस्ता उपलब्ध झाला. त्यासाठी त्यांचे कुटुंबाचे मोठे योगदान आहे तरी वाहतूक नगरीतील बालाजी पेट्रोल पंप शेजारुन खंडोबा मंदिरासमोरील जो रस्ता दत्तनगर,सिध्दीविनायक नगरीतून प्राधिकरण निगडीकडे जातो त्या रस्त्यास "कै.सिताराम बाबुराव काळभोर" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

-------------------------------

ठराव क्रमांक 20 विषय क्रमांक 2

दिनांक: 08/02/2022 विभाग: सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: शैलजा अविनाश मोरे अनुमोदक:अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक 02/02/2022 रोजीचा प्रस्ताव.

ट्रान्सपोर्टनगर निगडी येथील सहारा कम्युनिकेशन जवळील चौकाचे "कै बाबासाहेब धुमाळ चौक" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 21
दिनांक 08/02/2022
सुचक: मा.शैलजा अविनाश मोरे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक:मा.अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सदस्या शैलजा अविनाश मोरे यांचा दिनांक 02/02/2022 रोजीचा प्रस्ताव.

वसंत विठ्ठल जोशी हे माजी सैनिक होते व देशाची २८ वर्षे सैनिक अधिकारी म्हणून सेवा करीत.होते. तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमास त्यांचा मोठा हातभार होता. माजी सैनिक संघटनेच्या माध्यमातून सैनिकांच्या पेन्श्न संदर्भातील व इतर आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी नेहमीच प्रयत्न् केला आणि वरील परिसरात गेली ३० वर्षापासून वास्तव्यास होते.

तरी से.नं.२७ अ, सुवर्णयुग तरुण मित्र मंडळ चौक ते कॅ.जी.एस. तथा दादासाहेब कदम मार्गावरील चौकास "श्री वसंत विठ्ठल जोशी(माजी सैनिक)" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

---

ठराव क्रमांक 22
दिनांक : 08/02/2022
सुचक: मा.तुषार हिंगे

विषय क्रमांक 4
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक :मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- १) :- सन्मा.सदस्य तुषार रघुनाथ हिंगे यांचा दिनांक ०३/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

श्री रिजवान मुजावर रा.आण्णासाहेब मगर नगर, टिपू सुलतान रोड, चिंचवड पुणे-४११०१९ यांना चिंचवड एम्पायर स्क्वेअर येथील पार्किंग करिता पुलाखलील जागा भाडे कराराने देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 23

दिनांक :08/02/2022

सुचक: मा.अनुराधा गणपत गोरखे

विषय क्रमांक 5

विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

अनुमोदक :मा. शर्मिला राजू बाबर

संदर्भ:- १)सन्मा. सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दि.०८/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

१) चिंचवड स्टेशन येथील ग्रेड सेपरेटरला "आद्यगुरु क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदरचे नाव हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समतल विलगक जसे देणेत आले आहे त्याप्रमाणे देणेत यावे.

२)मोरवाडी स्मशानभूमि जवळील चौकास "प्रदिप रामचंद्र गायकवाड" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

३)तसेच दिनांक १७ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी आहे त्या अगोदर पुतळा सुशोभिकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

४) प्र.क्र.१० मध्ये रामनगर येथील राम मंदिरासमोरील दत्तनगर या ठिकाणी किन्नरांसाठी स्वच्छतागृह बांधणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 24

दिनांक :08/02/2022

सुचक: मा.अमित गावडे

विषय क्रमांक 6

विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

अनुमोदक :मा. शर्मिला राजू बाबर

संदर्भ:- सन्मा.सदस्य अमित राजेंद्र गावडे यांचा दिनांक ०८/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र. १५ आकुर्डी गंगानगर येथे महानगरपालिकेची व्यापारी संकुल इमारत आहे. सदर इमारतीस सामाजिक कार्यकर्ते "कै.कैलास शंकरराव पांढारकर व्यापारी संकुल" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 25

दिनांक :08/02/2022

सुचक: मा.शर्मिला राजू बाबर

विषय क्रमांक 7

विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

अनुमोदक :मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दिनांक ०८/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१५ येथे काळभोर सभागृहातील मनपा व्यायामशाळेत शौचालय नसल्यसाने तेथील नागरिकांची गैरसोय होत असल्याने तेथे त्वरीत शौचालय व वॉटर प्रुफिंग करुन देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 26 विषय क्रमांक 8

दिनांक :08/02/2022 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा.शर्मिला राजू बाबर अनुमोदक : मा.अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- सन्मा.सभापती शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे यांचा दिनांक ०८/०२/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी उड्डाणपुलाखाली गाळेधारकांना जागा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे परंतु त्यांना प्रत्यक्ष ताबा देणेत आलेला नाही. त्या गाळेधारकांपैकी इम्रार विजापुरे व जाफर मुल्ला या दोन गाळेधारकांना तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध् करुन देणेत यावी.पिंपरी पुलाखाली मनपामार्फत कार्यवाही पूर्ण झाल्यास संबधित गाळेधारक हे त्यांना नेमून दिलेल्या जागेत स्थलांतरित होतील. तरी सदरचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे- सभापती,अ प्रभाग समिति यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/15/2022
दिनांक:- 14 /02/2022.

(शितल वाकडे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति, सर्व संबंधित ---------------------------